आदिवासी उपयोजनेंतर्गत सन २०१७-१८ या आर्थिक वर्षाकरिता "औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी इमारत बांधणे " या योजनेखाली निधी वितरीत करण्याबाबत . ( लेखाशिर्ष ४२५० २४९४ )

**महाराष्ट्र शासन**
**आदिवासी विकास विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः बीयुडी-२०१७ / प्र.क्र.०३ ( कौशल्य विकास ) / कार्यासन.६**
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख: - २८ फेब्रुवारी, २०१८.

वाचा -

१) वि. वि, शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७.
२) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७.
३) वि. वि, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.९४ / अर्थ-३, दि. ३०.०६.२०१७.
४) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग नस्ती क्र. अर्थसं २४११/२०१७/प्र.क्र.१५८/व्यशि २

**शासन निर्णय :-**

आदिवासी उपयोजनांतर्गत मागणी क्र.टी-६, ४२५०- इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी इमारती बांधणे ( ४२५० २४९४ ) या लेखाशिर्षाखाली रु. ८.०० लाख निधी अर्थसंकल्पीत होता व रु.२५.४८ लाख इतका निधी बाब क्र. १२४ अन्वये हिवाळी अधिवेशन, २०१७ मध्ये मंजूर केलेल्या पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित करण्यात आला आहे.

२. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांनी वाचा क्र. ४ येथे प्रस्तावित केल्यानुसार औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा विस्तार करणे या योजनेखाली मागणी क्र. .टी-६, ४२५०- इतर सामाजिक सेवांवरील भांडवली खर्च, ७९६- जनजाती क्षेत्र उपयोजना, (०१) जनजाती क्षेत्र उपयोजनांतर्गत योजना- राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) औद्योगिक प्रशिक्षण संस्थांसाठी इमारती बांधणे ( ४२५० २४९४ ) ५३- मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली पुरवणी मागणीद्वारे अर्थसंकल्पित निधीच्या १००% मर्यादेत रु.२५.४८ लाख (अक्षरी रुपये पंचवीस लाख अठ्ठेचाळीस हजार फक्त ) इतका निधी प्रशासकीय विभाग / नियंत्रक अधिकारी म्हणून प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजकता विभाग, मंत्रालय, मुंबई यांना अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर (BEAMS ) वितरीत करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

३. उपरोक्त वितरीत केलेला निधी या प्रकल्पाच्या मंजूर प्रशासकीय मान्यता रकमेच्या मर्यादेत करण्याची तसेच त्यानुषंगाने निधी खर्च करण्यासंबंधीच्या नियमांचे पालन करण्याची दक्षता नियंत्रक अधिकारी यांनी घ्यावी.

४. सदर वितरीत निधी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर (BEAMS) खर्चासाठी नियंत्रक अधिकारी यांना सुपूर्द करण्यात येत आहे. नियंत्रक अधिकारी यांनी वितरित निधीच्या मर्यादेत खर्च करण्याची दक्षता घ्यावी.

५. उपरोक्त आदेश वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र.क्र.६८ / अर्थ-३, दि. ०१.०४.२०१७. व वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं-२०१७ /प्र.क्र.७५ / अर्थ-३, दि. १८.०४.२०१७ अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांच्या अधीन राहून व वित्त विभागाच्या अनौपचारीक

संदर्भ क्र. अ.स.क. ७ अर्थ-१९, दि ३०/०१/२०१८ अन्वये दिलेल्या मंजूरीनुसार निर्गमित करण्यात येत आहेत.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२२३१७०५४४७४२४असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Ravindra Digambarrao Aute

Digitally signed by Ravindra Digambarrao Aute
DN: cn=Ravindra Digambarrao Aute, o=Tribal Development Department, ou=Government of Maharashtra, email=rajendra.aute@nic.in, c=IN
Date: 2018.03.01 13:03:33 +05'30'

**(रविंद्र औटे)**
अवर सचिव.

**प्रत,**

१. प्रधान सचिव, कौशल्य विकास व उद्योजगता विभाग, मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
२. आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक.
३. प्र. संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४. अपर आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक/ नागपूर/ अमरावती.
५. ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ५ वा माळा, विधानभवन, मुंबई.
६. महालेखापाल (लेखापरिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
७. वित्त विभाग ( अर्थ-१९ ) / ( व्यय-१४ ) मंत्रालय, मुंबई-३२
८. निवडनस्ती, कार्यासन- ०६, आदिवासी विकास विभाग.